## शिक्षणसंस्था, हॉस्पिटले, मनोरंजनस्थळे, कार्यालये एकाच मार्गावर

# मेट्रो-३ने 'मुंबई कनेक्ट'



Jayant.howal
@timesgroup.com

**मुंबई :** अवघ्या तासाभरात कुलाब्याहून सीप्झपर्यंत नेणाऱ्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गामुळे ३० महत्त्वाच्या शिक्षणसंस्था, १३ मोठी हॉस्पिटले, ३० मनोरंजनस्थळे तसेच नरिमन पॉइंट, कफ परेड, बीकेसी, लोअर परळ आणि सीप्झ अशी उद्योग-व्यवसाय आणि रोजगाराशी संबंधित केंद्रे जोडली जाणार आहेत. दोन्ही विमानतळांसाठीही मेट्रो-३ उपलब्ध होणार आहे.

मेट्रो-३चा कारडेपो कांजुरमार्ग येथे उभारण्याचा निर्णय झाल्यास हा मार्ग सीप्झपासून थेट कांजुरमार्गपर्यंत जाईल. मेट्रो-३चा फायदा देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय विमानतळांना होईल. सध्या या दोन्ही विमानतळांदरम्यान २० ते ३० मिनिटांच्या अंतराने व्होल्व्हो बस धावतात. मेट्रो दर तीन ते चार मिनिटांनी धावणार असल्याने विमानतळापर्यंतचा प्रवास विनाविलंब होईल. पूर्णत: भू मिगत असणाऱ्या मेट्रो-३चा मार्ग शहराच्या दक्षिण टोकाला असणाऱ्या कफ परेडपासून पश्चिम उपनगरातील सीप्झपर्यंत जाणार असून, त्यात चर्चगेट, सीएसटी, गिरगाव, मुंबई सेंट्रल, वरळी, प्रभादेवी, दादर, माहीम, धारावी, सांताक्रूझ, कलिना अशा महत्त्वाच्या विभागांचा समावेश आहे. या मार्गावर एकूण २७ स्टेशने असून चर्चगेट, सीएसटी, मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी व मरोळ नाका येथे मध्य रेल्वे, पश्चिम रेल्वे व मेट्रो-१ मार्गाला मेट्रो-३ची कनेक्टिव्हिटी मिळेल. प्रवासी या सर्व ठिकाणी उपनगरी रेल्वे आणि मेट्रो-३ची अदलाबदल करू शकतील. याशिवाय महालक्ष्मी येथे मोनोरेल तर मरोळ नाका येथे मेट्रो-१लाही हा मार्ग जोडला जाईल.

**शाळा :** चिकित्सक, बालमोहन, कनोसा कॉन्व्हेंट, बॉम्बे स्कॉटिश, आर. सी. माहीम उर्दू स्कूल, सेंट जॉन्स इव्हँजलिस्ट हायस्कूल

**कॉलेजे :** सेंट झेवियर्स कॉलेज, एल्फिन्स्टन, केसी, एच. आर., एसएनडीटी, ऑलियॉंस फ्रान्सिस, इंडो जर्मन ट्रेनिंग सेंटर, सिद्धार्थ, जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्, विल्सन कॉलेज, पोद्दार आयुर्वेद मेडिकल कॉलेज, सस्मिरा इंजिनीअरिंग इन्स्टिट्यूट, रचना संसद, कीर्ती कॉलेज, चेतना कॉलेज, उत्तर भारतीय महासंघ कॉलेज

**ग्रंथालये व संग्रहालये :** एशियाटिक सोसायटी, आर कामा ओरिएंटल इन्स्टिट्यूट, छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, नेहरू सायन्स सेंटर, नेहरू तारांगण, जहांगिर आर्ट गॅलरी

**हॉस्पिटले :** सेंट जॉर्ज, कामा, बॉम्बे हॉस्पिटल, जी. टी., वाडिया, पोद्दार आयुर्वेद, शुश्रुषा, हिंदुजा, गुरू नानक, एशियन हार्ट इन्स्टिट्यूट, सेव्हन हिल्स

**धार्मिक स्थळे :** अफगाण चर्च, झुलेलाल मंदिर, गोल मशीद, सेंट थॉमस कॅथेड्रल, अहमदिया मशिद, सिद्धिविनायक मंदिर, पोर्तुगीज चर्च, माहीम दर्गा, सेंट मायकल (माहीम) व सेंट इव्हँजलिस्ट चर्च

**नाट्यगृहे व चित्रपटगृहे :** एनसीपीए, आयनॉक्स, मेट्रो, स्टर्लिंग, सेंट्रल प्लाझा, मराठा मंदिर, नेहरू सेंटर, यशवंतराव चव्हाण सेंटर, रवींद्र नाट्य मंदिर, प्लाझा, शिवाजी मंदिर

**क्रीडांगणे :** वानखेडे स्टेडियम, ब्रेबॉर्न, कूपरेज, हिंदू, बॉम्बे जिमखाना, ओव्हल मैदान, क्रॉस मैदान, पोलिस ग्राऊंड, जांबोरी मैदान, शिवाजी पार्क

**अन्य :** गिरगाव चौपाटी, जोगेश्वरी लेणी, महालक्ष्मी रेसकोर्स

मटा विशेष

## मोनोरेल गाठणार डिसेंबरची डेडलाइन

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

मोनोरेलच्या दुसऱ्या टप्प्यासाठी करी रोड आणि परळ स्टेशन दरम्यान महाकाय गर्डर टाकण्याचे महत्त्वाचे काम मार्गी लागल्याने आता मोनोशी संबंधित उर्वरित कामे वेगाने पूर्ण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे मोनोच्या दुसऱ्या टप्प्यासाठीची डिसेंबर, २०१५ची 'डेडलाइन' गाठली जाईल, अशी आशा आहे.

मोनोच्या दुसऱ्या टप्प्याचा मार्ग करी रोड आणि परळ स्टेशनवरून जातो. त्यासाठी या दोन्ही स्टेशनांच्या मध्ये गर्डर टाकणे आवश्यक होते. या गर्डरवरूनच मोनो धावणार आहे. हा गर्डर टाकण्यासाठी शनिवारी मध्यरात्री १२.३० ते रविवारी पहाटे ५.३० या वेळेत मध्य रेल्वेची सेवा बंद ठेवण्यात आली होती. एमएमआरडीए आणि लार्सन अँड टुब्रोच्या तज्ज्ञांनी गर्डर टाकण्याची मोहीम फत्ते केली.

मोनोच्या दुसऱ्या टप्प्यात आता अशा स्वरूपाची मोठी आव्हाने उरलेली नाहीत. स्टेशनांची तसेच सिग्नल यंत्रणेची उभारणी यांसारखी कामे शिल्लक आहेत. त्यामुळे ही कामे लगोलग हातावेगळी करण्यास यंत्रणा कामाला लागली आहे. गर्डर टाकण्याचे काम पूर्ण झाल्यामुळे गेल्या दीड वर्षापासून वाहतुकीसाठी बंद असलेला करी रोड पूल या आठवड्यात पुन्हा खुला होईल. हा पूल मागील दहा दिवसांपूर्वीच खुला होणार होता. परंतु गर्डर टाकण्याचे काम अपूर्ण असताना पूल खुला केल्यास अडचणी निर्माण होण्याची शक्यता होती. शिवाय गर्डर टाकण्यासाठी मध्य रेल्वेकडून विशिष्ट दिवसाची निश्चितीही होणे आवश्यक होते. या सर्व बाबी लक्षात घेता पूल खुला करण्याचा निर्णय लांबणीवर टाकण्यात आला होता.